राज्यात “मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना” सुरू करण्याबाबत ....

# महाराष्ट्र शासन

## उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

**शासन निर्णय क्रमांक: सौरप्र-२०१६/प्र.क्र.३५४/ऊर्जा-७.**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक: १४ जून, २०१७.

**संदर्भ:-** १) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.अपाऊ-२०१५/प्र.क्र.४९/ ऊर्जा-७, दिनांक २० जुलै, २०१५.

२) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.अपाऊ-२०१५/प्र.क्र.४९/भाग-८/ ऊर्जा-७, दिनांक ०९ सप्टेंबर, २०१५.

३) अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महानिर्मिती यांचे पत्र क्र.महानिर्मिती / सं.नि.सु./सौर ऊर्जा /कृषी फिडर / ०३६३०, दि.२५ मार्च , २०१७.

**प्रस्तावना :-**

राज्यामध्ये ऊर्जेच्या एकूण वापरापैकी कृषीक्षेत्राकरिता सुमारे ३०% ऊर्जेचा वापर होतो. प्रामुख्याने सदरच्या वीजेचा वापर कृषीपंपास वीज पुरवठा करण्यासाठी होत असून त्यामधून महावितरण कंपनीस महसूली तोटा सहन करावा लागतो. परंतु अशा परिस्थितीत देखील शेतकऱ्यांना माफक दरात वीज उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याने त्याकरिता महावितरण कंपनीस शासनाकडून मोठ्या प्रमाणात दरवर्षी अनुदान देण्यात येते. तसेच महावितरण कंपनीकडून कृषी ग्राहकांचा वीज दर माफक ठेवण्यासाठी वाणिज्यिक व औद्योगिक वीज ग्राहकांकरिता क्रॉस सबसिडीच्या रूपाने अधिक वीज दर आकारण्यात येतो.

राज्यातील शेतकऱ्यांना माफक दरात व त्यांच्या सोयीनुसार वीज पुरवठा उपलब्ध व्हावा, या दृष्टिकोनातून राज्यात सौर कृषी वाहिनी योजना सुरू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याकरिता राज्यातील ज्या ग्रामीण भागामध्ये गावठाण व कृषी वाहिनीचे विलगीकरण झाले आहे, अशा ठिकाणच्या कृषी वाहिनीचे सौर ऊर्जाद्वारे विद्युतीकरण केल्यास पारंपारिक विजेची मोठ्या प्रमाणात बचत होऊ शकते. तसेच सदर विजेचा वापर इतर उत्पादनक्षम कामांसाठी होऊ शकतो. त्यामुळे महावितरण कंपनीचा वीजेच्या खरेदीवर होणारा खर्च कमी होईल, पारंपारिक विजेची बचत होईल, महावितरण कंपनीच्या महसूलात वाढ होण्यास मदत होईल आणि वाणिज्यिक व औद्योगिक ग्राहकांसाठी विजेचा दर कमी राखण्यास मदत होईल.

**शासन निर्णय -:**

राज्यातील ज्या ग्रामीण भागामध्ये गावठाण व कृषी वाहिनीचे विलगीकरण झाले, अशा ठिकाणी कृषी वाहिनीचे सौर ऊर्जाद्वारे विद्युतीकरण करण्याच्या योजनेस शासन मान्यता देण्यात येत असून सदर योजनेस “मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना ” असे संबोधण्यात येईल.

२.	या योजनेनुसार राळेगणसिध्दी, जि.अहमदनगर व कोळंबी, जि. यवतमाळ या दोन ठिकाणी सौर कृषी वाहिनी योजना प्रायोगिक तत्वावर महानिर्मिती कंपनीमार्फत राबविण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

३.	सदरच्या योजनेची अंमलबजावणी महानिर्मिती कंपनीमार्फत करण्यात येईल. परंतु सदर योजनेच्या अंमलबजावणीच्या टप्प्यामध्ये त्या त्या विविक्षित ठिकाणी महाऊर्जा व महावितरण कंपनी यांचाही सहभाग असेल.

४.	महानिर्मिती कंपनीमार्फत राज्यातील ११ के.व्ही. ते १३२ के.व्ही. वीज उपकेंद्राच्या ५ कि.मी. ते १० कि.मी. परीसरामध्ये शासकीय जमीन उपलब्धतेचा शोध घेण्यात येईल. तसेच सदर ठिकाणी असलेल्या वीज उपकेंद्रावर जोडणी व विलगीकरण केलेल्या कृषी वाहिनीचा भार व त्यावरील कृषी ग्राहकांची संख्या आणि शासकीय जमीनीची उपलब्धता विचारात घेऊन, सौर कृषी वाहिनी प्रकल्पाची निवड अंतिम करण्यात येईल. तत्पूर्वी त्याबाबत महावितरण व महापारेषण कंपनी यांच्याकडून देखील त्याचा अभ्यास करून प्रकल्पाच्या व्यवहार्यतेबद्दल त्यांच्याकडून देखील अभिप्राय महानिर्मिती कंपनी घेईल.

५.	सौर कृषी वाहिनी योजनेच्या प्रकल्पाकरिता निश्चित केलेली शासकीय जमीन ३० वर्षाच्या कालावधीकरिता नाममात्र रू.१/- या दराने भाडेपट्टीने त्या त्या विभागाच्या व महसूल विभागाच्या मान्यतेने उपलब्ध करण्यासाठी स्वतंत्रपणे धोरणात्मक व सविस्तर आदेश महसूल विभागाकडून निर्गमित करण्यात येतील. अशी जमिन महसूल विभाग महानिर्मिती कंपनीस ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने देईल. महानिर्मिती अशी जमिन सदर योजनेंतर्गत खाजगी गुंतवणूकदारास भाडेपट्टयाने देईल. त्यानुसार करारनाम्यात अटी व शर्ती नमुद करण्यात याव्यात. सौर ऊर्जा प्रकल्पासाठी खाजगी जमिनधारकही आपली पडिक जमिन भाडेकराराने (Lease Basis) देऊ शकतील.

६.	सौर कृषि वाहिनीला उपलब्ध करुन देण्यात येणारी जमीन अकृषिक (NA) करण्याची गरज राहणार नाही. महानिर्मिती या प्रकल्पांची नोंदणी महाऊर्जाकडे मोफत करेल. तसेच अशा जमिनीची अकृषिक जमिनीमध्ये रूपांतर करणे अनिवार्य राहणार नाही व अशा जमिनीवर वा सौर ऊर्जा प्रकल्पांना महसूल अथवा स्थानिक स्वराज्य संस्था इ.विभागाकडून आकारण्यात येणाऱ्या सर्व करांतून/फी मधून प्रकल्प उभारणी पासून ते ३० वर्षांपर्यंत सूट राहील.

७.	सदरची योजना महानिर्मिती कंपनीमार्फत PPP (Public- Private Partnership) तत्वावर राबविण्यात येईल.

८. प्रकल्पाची जागा निश्चित झाल्यावर महानिर्मिती कंपनीकडून PPP (Public- Private Partnership) तत्वावर विहीत कार्यपध्दतीने संभाव्य ग्राहक संख्या विचारात घेऊन पारदर्शक व स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया (Competitive Bidding Process) राबवून खाजगी गुंतवणूकदाराची निवड करण्यात येईल.

खाजगी गुंतवणूकदाराकडून निविदा प्राप्त झाल्यानंतर ज्याचा सर्वात कमी वीजदर असेल (L-१ ) त्या निविदा धारकास प्राधान्याने काम देण्यात येईल तथापि L-१ वीजदरापेक्षा आणखी कमी वीज दराने प्रकल्पातून वीज पुरवठा करण्यास अन्य निविदाकारांची तयारी असल्यास त्यापैकी सर्वात कमी वीजदराने वीजपुरवठा करणाऱ्या निविदाकाराची निवड करण्यात येईल व त्यास महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाची मान्यता घेण्यात येईल.

९. प्रस्तावित ठिकाणी खाजगी गुंतवणूकदाराकडून सौर कृषी वाहिनी प्रकल्प उभारण्यासाठी महानिर्मिती कंपनीकडून योग्य तो करार विशिष्ट कालावधीकरिता करण्यात येईल. त्यामध्ये वीज खरेदीच्या अटी व शर्तींचा समावेश असेल. त्यापूर्वी स्पर्धात्मक निविदेद्वारे प्राप्त झालेल्या वीज दरास महानिर्मिती कंपनीकडून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाची परवानगी घेण्यात येईल.

१०. खाजगी गुंतवणूकदारांकडून सदर प्रकल्पाची उभारणी व त्याची देखभाल-दुरूस्ती खाजगी गुंवणूकदारासोबत केलेल्या करारात नमूद केल्याप्रमाणे निश्चित कालावधीसाठी करण्यात येईल.

११. सदर प्रकल्प निवड झालेल्या सौर कृषी वाहिनी पर्यंत वीजेचे निष्कासन करण्यासाठी होणारा खर्च महाऊर्जामार्फत हरित ऊर्जा निधीमधून करण्यात येईल.

१२. निवड झालेली सौर कृषी वाहिनी महावितरण कंपनीच्या वीज प्रणालीपासून विलग करून त्या फिडरवरील कृषी ग्राहकांना सौर कृषी वाहिनीमधून होणारा वीज पुरवठा महावितरणकडून करण्यात येईल व सदर वीज वितरण वाहिनीची देखभाल व दुरूस्ती महावितरण कंपनीकडून करण्यात येईल.

१३. सदर सौर कृषी वाहिनीमधील कृषी ग्राहकांच्याकडून वीज वितरण झालेल्या विजेच्या पुरवठ्यापोटी बिलाची वसुली महावितरण कंपनीकडून करण्यात येईल व ती सर्व वसुलीची रक्कम महानिर्मिती कंपनीकडे जमा करण्यात येईल.

१४. सदर वसुलीच्या रक्कमेतील काही निश्चित रक्कम महानिर्मिती कंपनी बिलाची वसुलीकरिता येणाऱ्या खर्चासाठी महावितरण कंपनीस अदा करेल.

१५. अशा ठिकाणी त्या कृषी ग्राहकांना वीज मिटर जोडलेले नसल्यास ते महावितरण कंपनीकडून जोडण्यात येतील.

१६. सदर प्रकल्पामधून निर्माण होणाऱ्या वीजेपैकी जेवढी वीज कृषी ग्राहकांना पुरविण्यात येईल त्या वीजेपोटी महानिर्मिती कंपनीकडून खाजगी गुंतवणूकदारांस वीज बिलाची रक्कम दर महिन्यास अदा करण्यात येईल.

१७. परंतु सदर वाहिनीवरील महावितरण कंपनीकडून संबंधीत कृषी ग्राहकांना दर महिन्यांत जो वीज पुरवठा करण्यात आलेला आहे त्या प्रत्येक युनिटमागे महावितरण कंपनीस सध्या कृषी ग्राहकांसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या सबसिडीची रक्कम अधिक महावितरण कंपनीस सध्या मिळणारी क्रॉस सबसिडीची रक्कम किंवा या योजनेस केंद्र शासनाकडून मिळणारा संभाव्य निधी/अनुदान विचारात घेऊन एकूण अनुदानाची रक्कम महानिर्मिती कंपनीस शासनाकडून अदा करण्यात येईल.

१८. ही योजना खाजगी किंवा सहकारी संस्थामार्फत राबविण्यात येईल.

१९. ज्या वीज उपकेंद्रावरील विलगीकरण केलेल्या कृषी वाहिनीचा भार व उपलब्ध शासकीय जमीन यानुसार कृषी वाहिनी सौर ऊर्जा प्रकल्पाची क्षमता अंतिम करण्यात येईल. जेथे शासकीय जमिनीची मुबलक उपलब्धता असेल अशा ठिकाणी उपलब्ध जमिनीवर विविध वीज उपकेंद्रा मधील एकापेक्षा अनेक कृषी वाहिनीचे संयुक्तीकरण करून सौर कृषी वाहिनी प्रकल्प (clustered AG solar Feeder project) उभारण्यात येईल.

२०. राज्यातील शेतीसाठी पाणीपुरवठा करणाऱ्या सर्व लिफ्ट इरिगेशन योजनांना वीज पुरवठा करण्यासाठी सौर कृषी वाहिनी प्रकल्पाद्वारे महानिर्मिती कंपनीकडून प्रयत्न करण्यात येतील.

२१. एक किंवा अनेक शेतकरी यांनी सहकारी संस्था स्थापन करून सदर संस्थेमार्फत सौर कृषी वाहिनी प्रकल्प उभारण्यासाठी महानिर्मिती कंपनीकडे प्रस्ताव सादर करू शकतील. सदर संस्थेमार्फत योग्य तो करार करून व त्यांच्याकडून खाजगी गुंतवणूक मिळवून सौर कृषी वाहिनी उभारू शकतील व त्या प्रकल्पातून संबंधित संस्थेच्या लाभार्थी शेतकऱ्यांना वीज पुरवठा करू शकतील. अशा प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या वीजेसाठी महानिर्मिती कंपनी स्पर्धात्मक निविदेप्रमाणे वीजदर संबंधित खाजगी गुंतवणूकदारास अदा करेल.

२२. PPP प्रकल्पांतर्गत या योजनेमध्ये सौर कृषी वाहिनीच्या प्रकल्पाची उभारणी व संपूर्ण दुरूस्ती-देखभाल खाजगी गुंतवणूकदाराकडून करण्यात येईल.

२३. सौर कृषी वाहिनी योजनेची अंमलबजावणी योग्यरित्या होण्यासाठी प्रधान सचिव (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात येत असून त्यामध्ये महावितरण, महानिर्मिती व महाऊर्जामधील संबंधित अधिकारी यांचा समावेश राहील. सदर योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना उद्भवणाऱ्या

अडचणींचा विचार करुन अटी व शर्तीमध्ये सुधारणा वा बदल करण्याचे अधिकार सदर समितीस राहतील.

२४. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १७३/का- १४६१,दिनांक २८ मे, २०१७ तसेच वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १४६/२०१७, दिनांक २६ मे, २०१७ नुसार दिलेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

२५. हा शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०६१४१२०६०८०३१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Ashok M Atram
Date: 2017.06.14 12:04:39 +05'30'

(अशोक आत्राम)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत:**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.मंत्री, (ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.राज्यमंत्री, (ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, वित्त / नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, सुत्रधार कंपनी मर्या., मुंबई
८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्या., मुंबई.
९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., मुंबई.
१०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्या., मुंबई.
११. महासंचालक, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), पुणे.
१२. सर्व मंत्रालयीन विभाग
१३.सर्व विभागीय आयुक्त.
१४. सर्व जिल्हाधिकारी.

१५. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

१६. सर्व विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य.

१७. निवड नस्ती-ऊर्जा-७ कार्यासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.